वन विभागातील वनपरिक्षेत्र
अधिकाऱ्यांची पदे वर्ग करण्याबाबत

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्रमांक : एफएसटी-०४/१९/प्र.क्र.७८/फ-४

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २२ एप्रिल, २०१९

वाचा :- प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.७(१)/आस्था-१/प्र.क्र.२७/व.सा.ए./२०१७-१८/१७०, दि.०७.०३.२०१९.

प्रस्तावना:-

सामाजिक वनीकरण विभाग, अकोला यांचेकडे ५० कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमाअंतर्गत असलेले वृक्ष लागवडीचे उद्दीष्ट, तसेच वनेत्तर क्षेत्रावर ग्रामपंचायत, शाळा, कारखाना, पडीक जमीन, रस्ता दुतर्फो, खाजगी जमीनीवर औद्योगिक क्षेत्रात वृक्ष लागवड, शेतीचे बांधावर वृक्ष लागवड इ. कामे सामाजिक वनीकरण विभागाकडून प्रगतिपथावर आहेत. या बाबीचा विचार करुन वनपरिक्षेत्र अधिकाऱ्याचे १ पद विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग, अकोला यांचेकडे वर्ग करण्याबाबतचा प्रस्ताव अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी संदर्भाधीन पत्रान्वये शासनास सादर केलेला आहे. त्यानुसार वनपरिक्षेत्र अधिकाऱ्याचे १ पद विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग, अकोला यांचेकडे वर्ग करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

वन विभागातील प्रचलित आकृतीबंधानुसार विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग, अमरावती यांचेकडील वनपरिक्षेत्र अधिकारी संवर्गातील १ पद विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग, अकोला यांचेकडे वर्ग करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर पदाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे :-

अ. क्र.	ज्या वन विभागातून पद वर्ग करण्यात येत आहे त्या वन विभागाचे नाव	पदनाम व पदसंख्या	ज्या वन विभागात पद वर्ग करण्यात येत आहे त्या वन विभागाचे नाव	वर्ग झाल्यानंतरचे पदनाम व पदसंख्या
१	विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग, अमरावती	**वनपरिक्षेत्र अधिकारी, समाजिक वनीकरण, भातकुली**	विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग, अकोला	**वनपरिक्षेत्र अधिकारी, समाजिक वनीकरण, बार्शीटाकळी**

२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी सदरहू पदे वर्ग करण्याबाबत आवश्यक ती पुढील कार्यवाही करावी.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०१९०४२२१६३८२१०७१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Babasaheb S. Shinde

Digitally signed by Babasaheb S. Shinde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=1706e7b903eb05a5f1c405f3795499452af658b876e10b223a0cef893b6b6689, cn=Babasaheb S. Shinde
Date: 2019.04.22 16:44:31 +05'30'

(बा. सि.शिंदे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति:

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक व महासंचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य नागपूर.
५. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), अमरावती / यवतमाळ.
६. वनसंरक्षक, सामाजिक वनिकरण, अमरावती.
७. मा. मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव.
८. मा. राज्यमंत्री (वने) यांचे खाजगी सचिव.
९. विभागीय वन अधिकरी, सामाजिक वनीकरण विभाग, अमरावती / अकोला.
१०. निवडनस्ती/फ-४